# काश्मीर - भाग १

## दल सरोवर - श्रीनगर




श्रीनगर विमानतळावरून विना अडथळा आम्ही नगीन लेकला पोहोचलो. एरवी पाऊण तासाच्या या रस्त्याला जेमतेम पंचवीस मिनिटंच लागली. रस्त्यावर पुर्ण शुकशुकाट होता. सीमा सुरक्षा दलाच्या जवानांचा खडा पहारा आणि एखाद दूसरा माणूस सोडून सगळं श्रीनगर घराघरात बंद होतं. गेले दोन अडीच महिने संचारबंदी असलेल्या शहरात आम्ही हट्टाने दाखल झालो होतो. मुझफ्फर आम्हाला न्यायला विमानतळावर आला होता त्यामुळे तशी काळजी नव्हती, हाऊसबोट जवळ पोहोचलो तेव्हा तीथे बाहेरच्या तणावाचा बागुलबुवा नव्हता. जेवणाच्या नादात बाहेरच्या संचारबंदीचा आम्हाला विसर पडला आणि पोटात चार काश्मीरी घास जाताच आमच्या अंगात उत्साह संचारला.

संध्याकाळच्या कलत्या उन्हात शिकाऱ्यातून जलविहाराला सुरवात झाली आणि तो अकबराचा महाल, समोर उंचावर दिसतो तो आद्य शंकराचार्यांचा मठ, तीथे अमक्या सिनेमाचं चित्रीकरण झालं, इथे बाजूला आता मोठं हॉटेल बनतय, शिकारा वल्व्हताना मुक्तार माहीती देत होता. कुणाचं लक्ष त्या माहितीकडे तर कुणाचं समोर दिसणाऱ्या पक्षांकडे. माझं मन मात्र गेल्या चार वेळच्या आणि आत्ता दिसणाऱ्या दृश्यांमध्ये तुलना करण्यात गुंतलं होतं. हेच ते पृथ्वी वरचं नंदनवन. जिथे मोगलांनी राज्य केलं, राजा हरी सिंहानी राज्य केलं, आज कोण राज्य करतय की अराजक आहे इथे?

गेल्या वेळी शिकाऱ्यातून पाहिलेलं ते अर्धवट जळलेलं मदीर, हिंदू पंडीतांची घरं, ती उजाड शाळा हे सगळं

माझी नजर शोधत होती. एवढ्यात पाण्यात सूरमारणारी ती दहा-बारा वर्षांची मुलं दिसली. आता उन्ह तिरकी झाली होती. दल सरोवराचं गार पाणी आणि वाहणारा वारा या मुळे पाण्याबाहेर येणारा मुलगा शिरशीरी काढत पुन्हा पाण्यात डुंबत होता. हे एवढच दृश्य पण त्याने तणाव बराच निवळला. याच वयाची मुलं आगी लावताहेत, जवानांवर दगड फेकताहेत अशी दृश्य प्रसारमाध्यात पाहून मन विषण्ण बनलं होतं. असो, पण त्याच श्रीनगर मध्ये अशी सूर मारणारी मुलंसुद्धा आहेत हे पाहून बरं वाटलं. 'कितीतरी दिवसात नाही चांदण्यात गेलो, कितीतरी दिवसात नाही नदीत डुंबलो' कवितेच्या ओळी सहजच मनात, आत कुठेतरी आठवत राहील्या. बाहेर कमळं दिसत होती.

ही खरी कमळं आपल्याकडे असतात ती व्हाईट लिली आपण त्यानाच कमळं म्हणतो. तो पॉन्ड हेरॉन, ती बघा बदकं, अरे हा तर खंड्या सारखा दिसतोय, हो खंड्याच तो पण राखाडी रंगाचा आपण नेहमी बघतो तो.... तो पहा पलिकडे दिसतोय. अरे इथे तर पक्षांची लयलूट आहे. कॅमेऱ्यांची बटनं दाबली जात होती... ती ती फ्रेम बंदीस्त होत होती. पण अंत:पटलावर अनेक दृश्य साठवली जात होती. जुन्यांची पुन्हा जुळवा जुळव होत होती. शिकारे फ्लोटींग मार्केट मध्ये थांबले. इथले व्यवहार पुर्वी प्रमाणेच चालू होते. अर्थात ग्राहकांची कमी होतीच.

शिकारे परतीला लागले, अर्थात आम्हीही. इथली परिस्थितीच अशी आहे. कोणतरी हाकतय, बाकीचे त्या दिशेने जातात. त्याना जायचं आहे का? हा वेगळा प्रश्न. दिशा दाखवणारा कुणी नाही. सकाळी लाल चौकातून आलो. आता सगळेच चौक लाल झालेत. रस्ते, पायवाटा सगळं लाल झालय. हे आपलच रक्त....... शरीरात असे पर्यंत ते हिंदू, मुसलमानाचं असतं. बाहेर पडल्यावर त्याचा रंग एक, गुण एक. ते भगवं किंवा हिरवं असतं का? गार वारा अंगाला झोंबत होता. काश्मिरच्या दऱ्याखोऱ्यातून वाहात येणारा हा वारा मन प्रसन्न करत होता. बाहेर एक एक दिवा पेटत होता. आकाशात तारकांची उपस्थिती जाणवायला लागली. क्षितिजावर लाली पसरली. अजूबाजूचे डोंगर निळाईने गडद होत गेले. संथपणे चालणाऱ्या आमच्या शिकाऱ्याच्या बाजूने झपाझप वल्हे चालवत छोट्या छोट्या होड्या ये जा करत होत्या. त्यातल्या काही नजरा आमच्याकडे कुतूहलाने तर काही रोखून पहात होत्या.

विस्तीर्ण आकाश आणि त्या खाली तेवढच विस्तीर्ण जलाशय – दल सरोवर. एकमेकाचं प्रतिबिंब निरखून पहात होती जणू. काळोख दाटून आला, दूरवरचे दिवे आता वेशीच्या खुणा बनले होते. तिन्ही सांजा झाल्या... आपाआपसातलं बोलणं थांबलं. तंद्री लागली होती जणू. मुक्तारचा सातवीत शिकणारा भाचा आता वल्हवत होता. कश्मिरी, हिंदी, इंग्रजी पाठ असलेली आठवतील ती गाणी म्हणत होता. 'यह थोडा तेज है। अंग्रेजी स्कूल मे जाता है।' मुक्तारने मध्येच माहिती दिली. तो गातच होता.




एवढ्यात त्याने गायला सुरवात केली ‘जन-जण-मन’ हे माझ्यासाठी नवं होतं. आशादायी होतं. लाल चौक, लाल रस्ते, लाल पायवाटांना ते उत्तर होतं. खुप खुप वर्षानी खुद्द काश्मिर मध्ये तो सूर सहजच कानी पडत होता. ‘जन-जण-मन’ ते स्वर माझ्या मनावर अधिराज्य करायला लागले. मन प्रफुल्लीत झालं. त्या सूरात अनेक सूर मिसळले जातील, काश्मिरच्या दऱ्याखोऱ्यातून हे सूर गर्जत राहतील. अशी आशा करायला हरकत नाही. तो सूर आजच उमटला आहे.

## जोझिला




श्रीनगरच्या हाऊसबोट वरचं रात्रीचं जेवण खासच होतं. गोश्त आणि शामी कबाब अजून विसरता येत

नाहीत. सकाळी लवकर उठण्याची घाई नव्हती तरी स्वच्छ हवेमुळे पहाटेच जाग आली. पक्षांच्या किलबिलाटामुळे कधी एकदा बाहेर पडून आसमंत न्याहाळतो असं झालं होतं. एका बाजूला सरोवर आणि दूसऱ्या बाजूला पर्वत रांगा, सुर्य किरणं येऊ घातलेली, माझा मित्र मानव हाऊसबोटीच्या सज्ज्यात ट्रायपॉड लाऊन मासे टीपणाऱ्या पक्षांची छायाचित्र घेण्यात मश्गूल होता. इकडे काठावर फुलांची फुलण्यासाठी अहमहमीका लागली होती. येणाऱ्या शिशीरा आधी त्यांना फुलून घ्यायचं होतं जणू. यवढ्यात समोरून शिकाऱ्यांची हालचाल दिसायला लागली. ते आमच्या दिशेनेच येत होते. आमच्या हाऊसबोट मधल्या वास्तव्याची वार्ता त्यांच्या पर्यंत पोहोचली होती तर. गेले दोन-तीन महिने संचारबंदीमुळे तिकडे पर्यटकांनी पाठ फिरवली असल्याने हे हातावर पोट असणारे अगदी धायकूतीला आले होते. आम्ही एकूण अकरा आणि हे विक्रेतेही जवळ जवळ तेवढेच. शाली, तयार कपडे, कीचेन्स, कलाकुसरीच्या वस्तू, केशर, कहावा हर तऱ्हेच्या वस्तू त्यांनी आणल्या होत्या, पण माझं लक्ष वेधून घेत होती ती शिकाऱ्यातून ओसंडून वाहणारी फुलं.

आजचा आमचा प्रवास द्रास मार्गे कारगील पर्यंतचा होता. सामानाची आवरा आवर करून मंडळी तयार झाली. गाड्या आल्या, सामान लावलं जात होतं. उन्हाचा त्रास नको म्हणून एका झाडाखाली सावलीला मंडळी थांबली होती. जवळच्याच क्वॅलीस गाडीच्या बोनेटवर कुणी पर्स तर कुणी हातातली पिशवी ठेवली होती. समोरून एक काश्मिरी मध्यमवयीन गृहस्थ(?) आला, सगळ्यांचा अकला काढत, उद्धार करीत त्याने त्या पिशव्या उधळून लावल्या. काल पासून आम्हाला कसलाच उद्रेक पाहायला मिळाला नव्हता, याने झलक दाखवली. या लोकांची मानसिकताच तशी झालीय, तो आमच्याकडे इंडीयन म्हणून पाहात होता. सगळा राग डोळ्यात उतरला होता. कसं होणार? यानाच पर्यटकांची गरज जास्त आहे. काश्मिर जळतय, हे त्यात तेल ओतताहेत. आमच्या सारखे जे फुटकळ पर्यटक आले त्याना हे असं दर्शन, वा..रे मेहमाननवाजी... आमचे ड्रायव्हर दूरून हे सगळ बघत होते. पण काहीच बोलले नाहीत. कदाचीत त्यांच्या मनात आमच्या विषयी वेगळॆ भाव नसावेत. आम्हाला हाच जोझीला पार करायचा होता, खऱ्या जोझीलाची काळजी वाटत नव्हती.

गाड्या चालू झाल्या, वाटेत गंधरबाल, कंगन ही करफ्यूग्रस्त गावं लागली. श्रीनगर ते सोनमर्ग नव्वद किलोमीटरचा प्रवास तसा धोक्याच्याच होता पण तो भाग मागे पडला. नितांत सुंदर अशा काश्मिरच्या खोऱ्यातून आमचा प्रवास सूरू होता. जागोजागी रानफुलांचा गालीचा पसरलेला होता आणि रस्त्याच्या दुतर्फा सफरचंदानी लगडलेल्या बागा लक्ष वेधून घेत होत्या. दोन तसात सोनमर्ग आलं, चला आता मानवनिर्मित धोक्यांची शक्यता जवळजवळ नाही. नैसर्गिक अडथळे हा तर आमच्या साहसी पर्यटनाचाच भाग होता.

दुपारचं जेवण आटोपून आम्ही जोझीलाच्या दिशेने निघालो. आमच्या लेह-लडाख सफरीची हे खरी सूरवात होती. जोझीला पास...... हाच तो पास जिथे कारगील युद्धाच्यावेळी जवानांच्या फलटणीच्या फलटणी युद्धातूर होवून निघाल्या होत्या. आज आणि उद्या आम्ही त्याच प्रांतातून मार्गक्रमण करणार होतो. कॅप्टनमोड ला गाड्या थांबवण्याच्या सुचना मी ड्रायव्हरना दिल्या होत्या पण बालतालच्या बरोबर समोर आमच्या गाड्या थांबल्या. काय झालं? एकदोन मिनीटं गाडीतच थांबून खाली उतरलो तेव्हा समजलं पुढे लॅन्डस्लायडींग झालं आहे. चला आता बसा. मी कमेरा घेवून आजूबाजूचे फोटो काढत होतो.

पुढे दूरवर येणाऱ्या ट्रकची लांबच लांब रांग लागली होती. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनचे (BRO) जवान रस्ता मोकळा करण्यात मग्न होते. तीथेच अर्धा-पाऊण तास गेला. रस्ता मोकळा झाला. आमची एक गाडी पुढे निघून गेली, मागे राहिलेल्या आमच्या दोन्ही गाड्यात जवान चालक होते. समोरून येणाऱ्या वाहनांचा अडथळा नको म्हणून आमच्या ड्रायव्हरने कच्च्या रस्त्याला गाडी घातली. त्या उभ्या चढावर गाडी चढेना, मग आम्ही खाली उतरलो. मागून ढकलत एक एक गाडी वर चढवण्याचा प्रयत्न झाला पण तीसऱ्या प्रतत्नानंतर तो नाद सोडून पुन्हा मुळ मार्गावर परतावरं लागलं.

त्या व्यापात एक तास वाया गेला. संध्याकाळचे पाच वाजून गेले होते आणि बराच पल्ला पार करायचा होता. द्रास, कारगील आता काळोखतच येणार याची काळजी वाटायला लागली. रस्ता जेमतेम असल्याने गाड्या वेगातही धावू शकत नव्हत्या, पुढे एका वळणावर ती आमची पुढे गेलेली गाडी उभी होती. आमच्या गाड्याही थांबल्या. दोन्ही तरूण चालकांची बिनपाण्याने हजामत होत होती. पुढे जायचा नाद त्याना भारी पडला होता.

- नरेन्द्र प्रभू

http://prabhunarendra.blogspot.com

http://shabdshabd.blogspot.com/